महाराष्ट्रातील जनतेचा आक्रोश, दैनिक नांदगांव

# आवाज

संपादक : भगवान सोनवणे

WWW.DAILYAWAZ.COM

RNI Reg. No.: MAHMAR/2014/66104 ■ वर्ष - १२ वे ■ अंक क्र. - १११ ■ शुक्रवार दि.१४ नोव्हेंबर २०२५ ■ किंमत - १ रूपया ■ पाने - ४


✲ उत्सुकता ✲




## नाशिक जिल्हा परिषदेच्या नूतन इमारतीतून सर्वसामान्यांसाठी चांगला कारभार होईल : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**दै. आवाज वृत्तसेवा...**

नाशिक, दि.१३: नाशिक जिल्हा परिषदेची इमारत राज्यातील सर्वात मोठी आणि सुंदर इमारत आहे. या इमारतीतून सर्वसामान्यांसाठी अतिशय चांगला आणि गतिमान कारभार होईल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.





नाशिक - त्र्यंबकेश्वर रोडवरील एबीबी सर्कलजवळ उभारण्यात आलेल्या जिल्हा परिषद नूतन प्रशासकीय इमारतीच्या उद्धाटन प्रसंगी ते बोलत होते. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, जलसंपदा मंत्री गिरीश महाजन, शालेय शिक्षण मंत्री दाद-ाजी भुसे, क्रीडा व युवक कल्याण मंत्री ड. माणिकराव कोकाटे, अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ, खासदार डॉ. शोभा बच्छाव, खासदार भास्कर भगरे, खासदार राजाभाऊ वाजे, आमदार सुहास कांदे, आमदार मुफ्ती मोहम्मद इस्माईल, आमदार दिलीप बोरसे, आमदार मंगेश चव्हाण, आमदार डॉ. राहुल आहेर, आमदार दिलीप बनकर, आमदार राहुल ढिकले, आमदार देवयानी फरांदे, आमदार सीमा हिरे आदी उपस्थित होते.

यावेळी मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले, राज्यातील जिल्हा परिषदांच्या इमारतीपैकी सर्वात सुंदर अशी ही इमारत झाली आहे. त्यामुळे जिल्ह्यातील मंत्री, लोकप्रतिनिधी, जिल्हा परिषदेचे अधिकारी, पदाधिकारी यांचे अभिनंदन केले पाहिजे. सुसज्ज सुविधांसह अस-लेली ही इमारत जनसामान्य व्यक्तींना सुविधा निर्माण करणारी ठरेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. यावेळी मुख्यमंत्री श्री.फडणवीस, उपमुख्यमंत्री श्री. शिंदे यांच्यासह मान्यवरांनी इमारतीची पाहणी केली. सुरुवातीला मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी फीत कापून आणि कोनशिलेचे अनावरण करून जिल्हा परिषद इमारतीचे उद्घाटन केले.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी ओमकार पवार यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि मान्यवरांचे स्वागत केले.

कार्यक्रमाला मान्यवरांसह जिल्ह्या-तील लोकप्रतिनिधी, जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष व पदाधिकारी, ग्रामविकास विभागाचे सचिव एकनाथ डवले, विभागीय आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम जिल्हाधिकारी आयुष प्रसाद, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी ओमकार पवार आदी उपस्थित होते. (पान २ वर)

## कुंभमेळ्यासाठी साडेपाच हजार कोटी रुपये खर्चाच्या विकासकामांचे भूमिपूजन

**दै. आवाज वृत्तसेवा...**

नाशिक, (जिमाका): येत्या सिंहस्थ कुंभमेळ्यासाठी नाशिक-त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरणातर्फे आणि नाशिक महानगरपालिका तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाच्यावतीने होणाऱ्या नाशिक शहरातील पाच हजार ६५७ कोटी ८९ लाख रुपये खर्चाच्या विकासकामांचे भूमिपूजन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले. सिंहस्थ कुंभमेळ्याची कामे दर्जेदार आणि पारदर्शक पद्धतीने करून नाशिकला सुंदर आणि आधुनिक शहर करणार, अशी ग्वाही मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिली.



ठक्कर मैदान येथे आयोजित या कार्यक्रमास उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, कुंभमेळा मंत्री गिरीश महाजन, शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे, क्रीडा मंत्री ड. माणिकाराव कोकाटे, खासदार राजाभाऊ वाजे, खासदार शोभा बच्छाव, मुख्य सचिव राजेशकुमार व नगर विकास विभागाचे अपर सचिव गोविंदराज (दूरदृश्यप्रणालीद्वारे), जिल्ह्याचे पालक सचिव एकनाथ डवले, नाशिक-त्र्यंबकेश्वर सिंहस्थ कुंभमेळा प्राधिकरणाचे अध्यक्ष डॉ.प्रविण गेडाम, आयुक्त शेखर सिंह आदी उपस्थित होते.

मागील कुंभमेळ्याचे चांगले आयोजन करण्यात आल्याचे नमूद करून मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, यावेळी कुंभमेळ्यात गतवेळेपेक्षा पाचपट अधिक भाविक येण्याची शक्यता आहे. भाविकांची व्यवस्था, सुरक्षा, पर्वस्नान व अमृतस्नानाचे नियोजन आणि या सोहळ्याचा मुळ गाभा असलेल्या आध्यात्मिकतेचा अनुभव भाविकांना देण्यासाठी विशेष प्रयत्न करावे लागतील. त्यासाठी नाशिकमध्ये केंद्र आणि राज्य शासनाच्या माध्यामतून २० हजार कोटींपेक्षा अधिकची कामे सुरू करण्यात येत आहेत. कुंभमेळ्यापर्यंत ही रक्कम २५ हजार कोटींपर्यंत पोहोचण्याची शक्यता असून त्यामुळे मोठ्या प्रमाणात पायाभूत सुविधा उभ्या राहतील. शासनाच्या सर्व विभागांनी समन्वयाने कामे केल्याने मोठ्या प्रमाणात कामाला सुरूवात होत आहे. नाशिक आणि त्र्यंबकेश्वरच्या नागरिकांनीही यासाठी सहकार्य केले आहे, असे त्यांनी सांगितले.

मुख्यमंत्री पुढे म्हणाले, कुंभमेळ्यासाठी रस्ते, महामार्ग दुरूस्ती, पिण्याच्या पाण्याची योजना, गोदावरीचे पावित्र्य राखणे, चांगल्या घाटांची निर्मिती, जुन्या मंदिरांचे पुनरुज्जीवन, विकासकामे करताना गोदाघाटाचे पुरातन रुप कायम ठेवणे यावर भर देण्यात येत आहे. नाशिक हे महत्त्वाचे तीर्थक्षेत्र असल्याने इथे होणारी विकासकामे पुढील २५ वर्ष टिकली पाहिजेज आणि नाशिक पर्यटनक्षेत्र म्हणून विकसित व्हावे, असा प्रयत्न या माध्यमातून होत आहे. या विकासकामांच्या माध्यमातून नाशिकचे रुप बदलेल आणि शहराच्या सर्वांगिण विकासाला चालना मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

कुंभमेळ्यात भाविकांचे व्यवस्थापन व्हावे यासाठी बाह्य वर्तुळाकार मार्ग तयार होत असून भविष्यातल्या नाशिकसाठी याचा फायदा होणार आहे. नाशिक विमानतळावर नवीन टर्मिनल इमारत, रेल्वे सुविधा, बस स्थानकाची सुविधा, स्मार्ट सीसीटीव्ही यंत्रणेच्या माध्यमातून आधुनिक नाशिक शहर विकसीत करण्यावर भर देण्यात येत आहे. एकूण बाराशे एकर जागा अधिग्रहीत करून त्यावर कुंभाचे आयोजन करण्यात येत आहे. भविष्यातही कुंभच्या आयोजनात कुठलीही अडचण राहणार नाही असा प्रयत्न आहे. कुंभमेळ्याची ही सर्व कामे पारदर्शी पद्धतीने होतील अशी ग्वाही मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिली. (पान ४ वर)


## लासलगावला ५२ हजार ५९० रूपयांचा अंमली पदार्थांचा साठा जप्त

**दै. आवाज वृत्तसेवा...**

लासलगाव - येथील साईनगर परिसरातील एका गाळ्यामध्ये साठवून ठेवलेला अंमली पदार्थ लासलगाव पोलीसांनी छापेमारीत पकडला. सहाय्यक पोलीस निरीक्षक भास्करराव शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली लासलगाव पोलीस स्टेशनच्या पथकाने ही कामगिरी आज दि. १३ रोजी दुपारी केली. या कारवाईत संशयित शैलेश नंदकुमार बागमार यांना ताब्यात घेत सुमारे ५२ हजार ५९० रूपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. याबाबत पोलीस सुत्रांकडून मिळालेली माहिती अशी की, लासलगाव येथील साई नगरमध्ये एका गाळ्यात पांढऱ्या गोण्यांमध्ये सुगंधीत तंबाखू व जर्दा गुटखा जो शरीरास हानीकारक आहे. असा मुदेदमाल साठवूण ठेवल्याची माहिती पोलीसांना मिळाली त्यानुसार वरील ठिकाणी छापेमारी केली असता वेगवेगळ्या पॅकेट व बॉक्समध्ये ठेवलेला अंमली पदार्थ साठा आढळून आला. त्याची किंमत सुमारे ५२ हजार ५९० रूपये इतकी आहे. ही कारवाई आज दि. १३ रोजी पावणे तीन वाजेच्या सुमारास करण्यात आली. या प्रकरणी संशयित आरोपी शैलेश नंदकुमार बागमार (वय २१) यास ताब्यात घेण्यात आले आहे. याप्रकरणी पोलीस कॉन्स्टेबल संदिप डगळे यांच्या फिर्यादीवरून लासल-गाव पोलीस स्टेशनमध्ये गुरनं. २६१/भा. न्य.संहिता कलम १२३, २२३, २७४, २७५ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक भास्करराव शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली पोउनिरीक्षक साळुंके करीत आहेत.

# दरवर्षी १४ नोव्हेंबर हा दिवस जागतिक मधुमेह दिन म्हणून साजरा केला जातो, त्यानिमित्ताने लेख..मधुमेह : आयुर्वेद दृष्टिकोन..

**दै. आवाज वृत्तसेवा...**

प्रस्तावना - आधुनिक वैद्यकानुसार मधुमेह (Diabetes) म्हणजे रक्तातील साखरेचे प्रमाण वाढणे एवढेच; परंतु आयुर्वेदाच्या दृष्टिकोनातून हा विकार केवळ शर्करा-वाढ नसून, शरीरातील दोष (दोषाः), धातू (धातवः), आहार-विहारातील असंतुलन, मानसिक ताण-तणाव आणि इंद्रिय असंयम यांच्याशी निगडित एक बहुआयामी विकार (Multifactorial Disorder) आहे.

मधुमेह हा प्रमेह नावाच्या व्याधीसमूहातील सर्वांत गंभीर प्रकार मानला जातो - ज्यामध्ये शरीरातील कफ, मेद आणि मांसधातूंचे दूषण होते आणि शेवटी वातदोष प्रबल होऊन मधुमेह निर्माण होतो.

१. आहारजन्य कारणे - चरक संहिता, चिकित्सा स्थान ६/११

अतिस्निग्धं मधुरं चापथ्यं च सेवनात्।
कफवृद्धिः प्रमेहाय कारणं परिकीर्तितम्।।

अनुवादः अतिशय स्निग्ध (तेलकट), मधुर (गोड) आणि अपथ्य (अयोग्य) अन्नाचे सेवन केल्याने कफ वाढतो आणि प्रमेह (मधुमेह) उत्पन्न होतो.

स्पष्टीकरणः गोड पदार्थ, दुग्धजन्य पदार्थ, तुपयुक्त जेवण, जड अन्नपदार्थ - हे सगळे कफ वाढवून शरीरातील मेदधातूंना दूषित करतात.



**डॉ. शशिकांत कापडणीस**
आयुर्वेदाचार्य । पंचकर्म तज्ज्ञ (केरळ)
सटाणा, जि. नाशिक
dr.shashikantkapadnis gmail.com ९७६६४९९२३३

२. विहारजन्य कारणे - अष्टांग हृदय, निदान स्थान १०/३

दिवास्वप्नोपसेविनां तैलाभ्य रतिक्रियाः।
आलस्याद्युपसेवी च प्रमेहिणमुदाहृतः।।

अनुवाद : दिवसा झोप घेणे, अतिप्रमाणात तेलाने अभ्यंग करणे आणि आळशी जीवनशैली हे प्रमेहाचे प्रमुख कारण आहे.

स्पष्टीकरणः अव्यायाम, सतत बसून राहणे आणि आरामदायी जीवनशैली यामुळे शरीरातील चयापचय मंदावतो आणि दोष संचित होतात.

३. मानसिक कारणे - चरक संहिता, चिकित्सा स्थान ६/५ (संदर्भानुसार)

मन्दप्रज्ञा हतविज्ञानाः प्रमेहिणो भवन्ति हि।।

अनुवादः मानसिक ताणतणाव, चिंता आणि असंतुलित विचारशक्ती असलेल्या व्यक्तींना प्रमेह होण्याची शक्यता जास्त असते.

स्पष्टीकरणः मन व शरीर दोन्ही निष्क्रिय झाल्यास आहार-विहारातील शिस्त मोडते, ज्यामुळे दोष संतुलन बिघडते. ४. आनुवंशिक कारणे (बीज दोष) चरक संहिता, शरीर स्थान ३/१७

बीजदोषात् प्रमेहिणः स्युः।।

अनुवादः शुक्र किंवा अर्तवातील दोष असल्यास वंशपरंपरेने प्रमेह होऊ शकतो. हेच आधुनिक भाषेत Juvenile Diabetes म्हणून ओळखले जाते.

५. धातूंचा क्षय - सुश्रुत संहिता, निदान स्थान ६/३

मेदोमांसवसाग्रन्थीनां स्रवः प्रमेहसञ्ज्ञकः।
सर्वेषां प्रमेहाणां कारणं कफमेव हि।।

अनुवादः मेद, मांस आणि वसा धातूंचा स्राव म्हणजेच प्रमेहाचे लक्षण होय. याचे मूळ कारण कफदोषच आहे.

स्पष्टीकरणः शरीरातील ऊतकांचा (धातूंचा) अपच व क्षय झाल्यास ते मूत्रमार्गातून बाहेर टाकले जातात - हेच डायबेटिक किटो ॲसिडोसिस सारखे गंभीर रूप धारण करते.

६. इंद्रिय संयमाचा अभाव अष्टांग संग्रह, निदान स्थान १०/२

सर्वेन्द्रियनिग्रहवर्जितः प्रमेही स्यात्।।

अनुवादः ज्याच्यात इंद्रिय संयम नाही, जो भोगविलासप्रिय आहे - तो प्रमेही होतो.

स्पष्टीकरणः अति भोगविलास, अन्न-विहारातील असंयम, आणि अतिव्यसन ही प्रमेहाची गुप्त कारणे आहेत. ७. दोषांची प्रगती - कफ ते वात चरक संहिता, चिकित्सा स्थान ६/१४

कफादौ च प्रमेहस्तु पश्चात् वायुनोपद्रुतः।
संसृष्टः सर्वधातुभ्यः मधुमेही प्रजायते।।

अनुवादः प्रमेह हा आरंभी कफदोषामुळे निर्माण होतो; पण नंतर वायूच्या प्रकोपामुळे तो तीव्र होतो आणि सर्व धातूंना प्रभावित करतो. स्पष्टीकरणः हीच प्रक्रिया टाईप दोन डायबिटीज पासून टाईप एक डायबिटीस मध्ये संक्रमणासारखी दिसून येते.

आयुर्वेदिक दृष्टिकोनातून विचार आयुर्वेदाने हजारो वर्षांपूर्वी वर्णन केलेली मधुमेहाची कारणे आजही वैज्ञानिक दृष्ट्या सत्य सिद्ध होत आहेत. आधुनिक विज्ञान जेथे इन्सुलिन व शर्करा नियंत्रण यावर भर देते, तेथे आयुर्वेद अधिक खोलवर जाऊन मूळ कारणांवर उपाय सुचवतो - आहार, विहार, मानसिक संतुलन आणि दोष-धातूंच्या समतोलाचा उपचार हा खरा आयुर्वेदिक दृष्टिकोन आहे.

आरोग्य संदेश - मधुमेहावर नियंत्रण ही औषधांवर अवलंबून नसून, संयम, संतुलन आणि सातत्यपूर्ण आरोग्यशिस्तीवर अवलंबून असते. योग्य आहार-विहार, नियमित व्यायाम, निद्रा आणि मानसिक शांती यांच्यासोबत तज्ज्ञ आयुर्वेद वैद्यांचा सल्ला घेऊन उपचार केल्यास मधुमेहावर नियंत्रण शक्य आहे.

## इंडियन ऑइल कार्पोरेशन लिमिटेड भारडी येथील जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन



**दै. आवाज वृत्तसेवा...**

भारडी येथे इंडियन ऑइल कार्पोरेशन लिमिटेड पश्चिम क्षेत्र पाईपलाईन मनमाड. यांच्यावतीने आज भारडी येथे जिल्हा परिषद प्राथमिक शाळा भार्डी येथील शाळेत भेट देऊन जितेंद्रजी सिंग साहेब व पांडुरंग जी ठाकरे साहेब यांनी मुलांना व गावातील ग्रामस्थांना पेट्रोल डिझेल ची गेलेली पाईपलाईन विषयी काळजी घेण्याची व काही संशयास्पद वाटत असल्यास तात्काळ टोल फ्री नंबर वर संपर्क करण्याची माहिती दिली तसेच पाईप लाईनच्या आसपास असणाऱ्या सर्व शेतकऱ्यांनी जागरूक राहून आपल्या राष्ट्रीय संपत्तीची नुकसान होणार नाही याची काळजी घेण्याची आव्हान केले तसेच शाळेतील मुलांना शालेय बॅग, ड्रॉइंग साहित्य व बिस्कीट वाटप करण्यात आली या कार्यक्रमाप्रसंगी इंडियन ऑईलचे वरिष्ठ अधिकारी कॅप्टन श्री जितेंद्र सिंग (वरिष्ठ प्रचालन प्रबंधक) श्री पांडुरंग ठाकरे (सुरक्षा पर्यवेक्षक). श्री कचरू वाघ (सुरक्षारक्षक) इंडियन ऑइल कॉर्पोरेशन पश्चिम क्षेत्र पाईपलाईन विभाग मनमाड,शालेय समिती अध्यक्ष आण्णा सरोदे, उपसरपंच गणेश सरोदे मुख्याध्यापक चव्हाण सर, दाभाडे मॅडम, पो. पा.भाऊसाहेब मार्कंड ,जिभाऊ मार्कंड राजेंद्र पवार, संजय मार्कंड, सुदाम सरोदे, भाऊसाहेब मार्कंड, प्रकाश सरोदे, संदीप चोरमले, गणेश पवार, अथर्व पगारे,अजय पवार, काशाबाई पगारे, जयश्री मार्कंड, कोमल पवार, संगीता पवार सर्व शालेय विद्यार्थी विद्यार्थिनी व ग्रामस्थ उपस्थित होते. या कार्यक्रम प्रसंगी अण्णा सरोदे यांनी मनोगत व्यक्त करीत असताना आमच्या या छोट्याशा गावातील जिल्हा परिषद मराठी शाळेसाठी इंडियन ऑइल या कंपनीच्या सी एस आर फंडातून काही मदत मिळावी असे कंपनीच्या वरिष्ठ अधिकारी यांच्याकडे गावचे सरपंच उपसरपंच व गावाच्या वतीने शाळेच्या वतीने मागणी केली आणि आलेल्या सर्व अधिकारी ग्रामस्थांचे आभार व्यक्त करून कार्यक्रम संपला अशी जाहीर केले.

## नाशिक महानगरपालिकेच्या ३७० कोटी रुपयांच्या जलशुद्धीकरण प्रकल्पाचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते उद्घाटन

**दै. आवाज वृत्तसेवा...**

नाशिक, महाराष्ट्र - १३ नोव्हेंबर २०२५ - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज नाशिक महानगरपालिकेच्या २७४ एमएलडी क्षमतेच्या विल्होली जलशुद्धीकरण प्रकल्पाचे (डब्ल्यूटीपी) आणि मुकाणे पाणीपुरवठा योजनेच्या विस्तारीकरणाचे उद्घाटन केले. ३७० कोटी रुपयांच्या या प्रकल्पाचे उद्दिष्ट २०५५ पर्यंत नाशिकमधील ५५ लाखांहून अधिक रहिवाशांना सुरक्षित, विश्वासार्ह आणि शाश्वत पाणीपुरवठा सुनिश्चित करणे आहे आणि आगामी २०२७ च्या सिंहस्थ कुंभमेळ्यादरम्यान अंदाजे १ कोटी धार्मिक पर्यटकांना सेवा प्रदान करणे आहे.

या प्रकल्पाचे उद्दिष्ट यात्रेकरू, पर्यटक आणि रहिवाशांना पुरेसा पाणीपुरवठा सुनिश्चित करणे आहे. यामुळे स्थानिक रोजगार आणि पर्यटन व्यवसायांना देखील मदत होते, ज्यामुळे प्रादेशिक अर्थव्यवस्था मजबूत होते. नाशिक महानगरपालिकेने प्रकल्पाच्या आंशिक निधीसाठी अंदाजे २०० कोटींचे ग्रीन सस्टेनेबल बॉन्ड्स जारी करून, शहराने आर्थिक स्वावलंबनाचे उदाहरण दिले आहे आणि नैतिक सार्वजनिक प्रकल्प अंमलबजावणीसाठी एक आदर्श स्थापित केला आहे.

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस म्हणाले, हा जल पायाभूत सुविधा प्रकल्प राज्याच्या शाश्वत विकास आणि लवचिक शहरी व्यवस्थेच्या वचनबद्धतेतील एक मैलाचा दगड आहे. नाशिकमध्ये पाणी सुरक्षा, पर्यावरणीय शाश्वतता आणि स्थानिक उपजीविका मजबूत करून भारताच्या शाश्वत विकास उद्दिष्टे (डऊॠ) आणि विकसित भारत २०४७ च्या दृष्टिकोनाला ते समर्थन देते.

विल्होली जलशुद्धीकरण प्रकल्प आणि मुकाणे पाणीपुरवठा वाढवणे हा माननीय मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात येणारा एक प्रकल्प आहे. हा प्रकल्प नाशिकच्या शहरी पायाभूत सुविधांमध्ये वाढ करण्याबरोबरच सार्वजनिक कल्याण, आरोग्य आणि सामुदायिक कल्याणासाठी नाशिक महानगरपालिकेची दृढ वचनबद्धता देखील दर्शवितो. २०२७ च्या कुंभमेळ्यापूर्वी पूर्ण होण्याचे नियोजित असलेले हे प्रकल्प नाशिकला मोठ्या प्रमाणात सार्वजनिक मेळावे आयोजित करण्याची क्षमता टिकवून ठेवेल आणि त्याचबरोबर नागरिकांसाठी पाणी सुरक्षा आणि समानता सुधारेल. हा उपक्रम महाराष्ट्र सरकारच्या समावेशक आणि शाश्वत शहरी विकासाच्या दूरदर्शी दृष्टिकोनाचे प्रतिबिंबित करतो.

नाशिक महानगरपालिकेच्या आयुक्त आणि प्रशासक मनीषा खत्री म्हणाल्या, नाशिक महानगरपालिका महसूलेतर पाण्याचे प्रमाण लक्षणीयरीत्या कमी करून नाशिकला जागतिक दर्जाचे मानदंड म्हणून स्थान देण्यासाठी वचनबद्ध आहे. एनआरडब्ल्यू सध्याच्या ४५% वरून २७% पर्यंत कमी करण्याचे उद्दिष्ट आहे, ज्याचे अंतिम लक्ष्य ५% आहे. प्रमुख उपक्रमांमध्ये १५.७ किमी सौम्य-स्टील शुद्ध-पाणी गुरुत्वाकर्षण वाहिन्यांची स्थापना आणि ७.९ किमी डक्टाइल-लोखंडी वाहिन्यांची स्थापना, शहराचा पाणीपुरवठा वाढविण्यासाठी गंगापूर धरण प्रकल्प, अमृत वितरण लाइन बदलण्याचा प्रकल्प आणि मुकणे धरण प्रकल्प यांचा समावेश आहे, ज्यामध्ये पाण्याची लवचिकता वाढविण्यासाठी नवीनतम तंत्रज्ञान आणि स्काडा ऑटोमेशन समाविष्ट आहे. या प्रयत्नांचे एकत्रित उद्दिष्ट पाणी सुरक्षा मजबूत करणे आणि वर्षभर विश्वसनीय पिण्यायोग्य पाण्याची उपलब्धता सुनिश्चित करणे आहे.

हा प्रकल्प सर्व ऋतूंमध्ये पाण्याची उपलब्धता सुनिश्चित करतो आणि इतर भारतीय शहरांमध्ये आढळणाऱ्या हवामान लवचिकतेच्या आव्हानांना तोंड देतो. तांत्रिक, आर्थिक आणि स्वतंत्र तृतीय-पक्ष निकषांवर बहु-चरणीय मूल्यांकनांसह, कठोर सरकारी खरेदी प्रोटोकॉलचे पालन केले आहे.

## नाशिक जिल्हा परिषदेच्या....

(पान १ वरून)

**✻ जिल्हा परिषद नाशिक नूतन इमारतीची वैशिष्ट्य ✻**




त्र्यंबकेश्वर रोडवरील एबीबी सर्कलजवळ उभारण्यात आलेली जिल्हा परिषद नाशिकची नूतन प्रशासकीय इमारत इमारत जिल्हा परिषदेच्या प्रगतिशील दृष्टिकोनाचे प्रतिक आहे. शाश्वत विकास, ऊर्जा बचत, सुरक्षा आणि सोयी या सर्व बाबींचा विचार करून बांधकाम करण्यात आले आहे. ऊर्जासक्षम बांधकाम, पुरेसा नैसर्गिक प्रकाश व खेळती हवा, तसेच छतावर सोलर सिस्टीम बसविल्यामुळे वीज खर्च शून्याच्या जवळ जाणार आहे. रेन वॉटर हार्वेस्टिंगद्वारे जलसंवर्धन आणि पर्यावरणपूरक उपक्रमांना चालना देण्यात आली आहे. इमारतीत अधिकारी आणि कर्मचाऱ्यांसाठी अध्ययन, संशोधन आणि संदर्भासाठी सुविधा आहे. महिला कर्मचाऱ्यांसाठी स्वतंत्र, सुरक्षित व आरामदायी विश्रांतीगृह तयार करण्यात आले आहेत. परिषद, प्रशिक्षण, बैठका आणि कार्यक्रमांसाठी आधुनिक सुविधा असलेले बहुउद्देशीय सभागृह आणि सर्वसाधारण सभा हॉल तयार करण्यात आला आहे. यासह मनोरंजन कक्ष, उपहारगृह, ॲम्फीथिएटरयुक्त प्रांगण व कोर्टयार्ड, पार्किंग सुविधा, सुरक्षा यंत्रणा, प्राथमिक उपचार केंद्र, सहा कॉन्फरन्स हॉल, प्रत्येक मजल्यावर ८ ते १२ फूट रुंदीचा पॅसेज, चार लिफ्ट आणि पाच जिन्यांची व्यवस्था, सार्वजनिक सुविधा केंद्र, बँक कार्यालये, दिव्यांग कक्ष, अभिलेख कक्ष, व्हिडिओ कॉन्फरन्सिंग रूम यांसारख्या सुविधादेखील इमारतीत आहेत.

हे पत्रक मालक, मुद्रक, संपादक, प्रकाशक, भगवान नामदेव सोनवणे यांनी शार्प ऑफसेट, मालेगांव बस स्टँड समोर, मालेगांव येथे छापून ढासे मळा, सावता नगर, नांदगांव ता.नांदगांव, जि.नाशिक येथे प्रकाशित केले. सहसंपादक भाऊसाहेब हुजबंद (८९९९९२१९९४). या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या, लेख, जाहिराती यामधून व्यक्त झालेल्या मतांशी मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक, सहसंपादक सहमत असतीलच असे नाही. मुद्रण दोष संभवनीय. (नांदगांव न्यायकक्षेत) सर्व अधिकार सुरक्षित. मो. ९५४५९१०१७७ - ९२७२४५३९२१ email : nandgaonawaz@gmail.com

# येवल्यात कुणाल दराडे फाऊंडेशनकडून विजेत्या ३२ बक्षीसे देऊन महिलांचा गौरव

## रांगोळी स्पर्धेत अमृता, विद्या, इशा, पलक, वैभवी, स्वाती, आदिती ठरल्या विजेत्या

**दै. आवाज वृत्तसेवा...**

लक्ष्मण घुगे राजापूर प्रतिनिधी : येथील श्री. लकुणाल दराडे फाऊंडेशनच्या वतीने दिवाळीनिमित्त घेतलेल्या रांगोळी स्पर्धेत महिलांनी अप्रतिम कलाविष्कार साधत येवल्याच्या उत्सवाची परंपरा अधिक रंगतदार बनविली.या स्पर्धेचे बक्षीस वितरण समारंभ पार पडला असून वेगवेगळ्या गटात अमृता गुजराती,वैभवी डुकरे,पलक परदेशी, ईशा पटेल,आदिती पटेल,किशोर भोसले, स्वाती भागवत आदीनी प्रथम क्रमांक मिळवत विजेते ठरले. दिवाळीच्या निमित्ताने चुरशीच्या व दिमाखात झालेल्या कुणाल दराडे फाऊंडेशनच्या भव्य रांगोळी स्पर्धेचे बक्षीस वीतरण समारंभ पार पडला.यावेळी फाऊंडेशनकडून ३२ आकर्षक बक्षीसे देऊन महिलांचा गौरव करण्यात आला. विशेष म्हणजे २०० महिलाना यावेळी भेटवस्तू देऊन गौरविण्यात आले.बक्षिस वितरण कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी फाउंडेशनचे संस्थापक कुणाल दराडे होते. तर संगीता पटेल,तृप्ती राजपूत,प्रिया




शर्मा,निलश्री गुजराथी,शितल कोळस, दीपिका गुजराथी, अनामिका गवते,यशश्री पोंदे यांची प्रमुख उपस्थिती होती. शहराची सांस्कृतिक व उत्सवप्रियता राज्याला आदर्शवत असून येथील नागरिकांनी सर्व सण-उत्सव साजरे करण्याची जपलेली परंपरा अव्वल दर्जाची आहे.ही परंपरा जपण्यासाठी फाउंडेशन पुढाकार घेऊन या स्पर्धेचे आयोजन केल्याचे कुणाल दराडे फाऊंडेशनचे संस्थापक कुणाल दराडे यांनी यावेळी सांगितले. येथे एक से बढकर एक रांगोळीच्या अदाकारीने दारापुढील रांगोळी स्पर्धेत २३७ महिलांनी हिरीरीने आपला सहभाग नोंदवला.विविध रंगांच्या रांगोळ्यातुन उत्कृष्ट कलाविष्कार साधत महिलानी एकाग्रतेने पाच-सात तास घालवून मग्न होत हे काढलेल्या रांगोळ्या पाहत राहव्या अशा होत्या.महिलांनी कलाविष्कार साधत सप्तरंगी रांगोळीतून अवकाळी पाऊस आणि शेतकऱ्यांचे नुकसान,पोपट-डिझायनर येवला पैठणी,वृंदावनचे प्रेमानंद महाराज, महादेव पार्वती,विठ्ठलरूखिमीनी,दत्ताची रूपे,ज्ञानदेव मुक्ताबाई भगतसिंगांची पाचशे रुपयांची नोट, हमदाबाद मधील विमान अपघात,मुलगीवाचवा मुलगी शिकवा यासह शिवाजी महाराज, श्रीराम मंदिर, महिला सन्मान अशा अनेक सुंदरशा रांगोळ्यांनी लक्ष वेधले.याशिवाय मातृप्रेम,पाणेफुले,धार्मिक प्रसंग,पशुपक्षी,व्यक्तीचित्रे,निसर्ग चित्रे,बेटी बचाव,थ्रीडी अशा विविध विषयावरील रेखाटलेल्या रांगोळ्या नजरेत भरणाऱ्या होत्या.रांगोळ्यांच सौदर्य खुलविण्यासाठी आकर्षक रोषणाई,मंजुळ सुरात ध्वनीफीत होती.सुंदर व त्यावर घेतलेली मेहनत पाहिल्यावर परिक्षकांची चांगलीच कसरत झाली.विशेष म्हणजे मुलीसह पुरुषांनी देखील देखण्या रांगोळ्या काढल्या. या स्पर्धेचा निकाल जाहीर करून पारितोषिक वितरण झाले.विजेत्या भगिनींना पाच गटात आकर्षक भेटवस्तू देऊन गौरविण्यात आले. तर सहभागी सर्व स्पर्धकांना भेटवस्तू देण्यात आल्या.महिला भगिनींचा उत्साह-ने कार्यक्रमात अधिकच रंगत आली.सर्व गटातील अतिशय देखण्या रांगोळ्यांचा आऊटस्टँडिंग परफॉर्मन्स फॉरएव्हर हा गट करून त्यातील सर्व विजेत्यांना प्रथम क्रमांकाने गौरविण्यात आले.फाऊंडेशनचे विजय गोसावी, अक्षय राजपूत,आत्मेश विखे,राहुल भावसार आदींनी नियोजन केले.

✻ या महिला झाल्या विजेत्या

आऊटस्टँडिंग परफॉर्मन्स फॉरएव्हर : अमृता गुजराथी,आदिती मनोज पटेल,आदिती गिरिश पटेल,किशोर भोसले,स्वाती भागवत

टिपक्यांची रांगोळी : प्रथम : इशा पटेल,
द्वितीय : श्रावणी खेरुड,तृतीय : प्रिती लोखंडे,चतुर्थ : तेजस्विनी कुक्कर.

संस्कार भारती : प्रथम : विद्या लूटे,
द्वितीय : राजश्री कासार,तृतीय : राखी कायस्थ व वैशाली सावंत,चतुर्थ : ऋतिका भावसार

मुक्तहस्त गट (फ्री हॅंड) : प्रथम : वैभवी डुकरे,द्वितीय : ज्योती कुक्कर व वैष्णवी कुक्कर,तृतीय : अमिषा कासार, चतुर्थ : गौरव सैदाणे व निकिता आरणे

१४ वर्षाखालील गट : प्रथम : पलक परदेशी,
द्वितीय : स्वराक्षी दाभाडे,तृतीय : सिया नागपुरे, चतुर्थ : साक्षी कुक्कर, उत्तेजनार्थ : प्रनवी ठाकूर, सिद्धी खेरुड, रियांश कोकणे.

# रामकाल पथाचे भूमिपूजन

**दै. आवाज वृत्तसेवा...**

नाशिक (जिमाका): केंद्र सरकारच्या पर्यटन मंत्रालयाच्या माध्यमातून ‘स्पेशल असिस्टंट टू स्टेटस् फॉर कॅपिटल इन्व्हेस्टमेन्ट’ योजनेंतर्गत ९९ कोटी १४ लाख रुपये खर्चातून रामकुंडसह परिसरात साकारण्यात येणाऱ्या रामकाल पथचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते भूमिपूजन करण्यात आले. नाशिक येथील रामकुंड परिसरात झालेल्या या कार्यक्रमास उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, कुंभमेळा मंत्री गिरीश महाजन, शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे, क्रीडा मंत्री अॅ्ड. माणिकराव कोकाटे, आमदार अॅड. राहुल ढिकले, आमदार दिलीप बनकर, आमदार देवयानी फरांदे, आमदार सीमा हिरे, विभागीय आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम, नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरणाचे आयुक्त शेखर सिंह, पोलीस आयुक्त संदीप कर्णिक, महानगरपालिका आयुक्त मनीषा खत्री, जिल्हाधिकारी आयुष प्रसाद, कुंभमेळा अतिरिक्त आयुक्त कल्पना नायर, सहायक जिल्हाधिकारी अर्पिता ठुबे आदी उपस्थित होते.मुख्यमंत्री फडणवीस यांनी



संकल्पचित्र आणि प्रतिकृतीच्या माध्यमातून रामकाल पथाची माहिती जाणून घेतली. रामकाल पथ प्रकल्पाच्या माध्यमातून रामकुंड मार्ग, रामकाल पथवरील संपूर्ण संरचनांचे संवर्धन, दर्शनी भागांचा जीर्णोद्धार तसेच पर्यटकांसाठी पायाभूत सुविधांमध्ये सुधारणा करण्यात येणार आहे. रामकुंड, सीता गुंफा, काळाराम मंदिर, राम लक्ष्मण गुंफा आणि इतर ऐतिहासिक मंदिर परिसराचे आध्यात्मिक, सांस्कृतिक आणि ऐतिहासिक महत्त्व प्रकल्पामुळे भाविकांपर्यंत पोहोचेल. देशभरातून गोदातटी येणाऱ्या भाविकांसाठी आनंददायी अनुभव देण्याच्या दृष्टीने आणि या पवित्र स्थळाचे स्थान महात्म्य त्यांच्यापर्यंत पोहोचविण्यासाठी हा प्रकल्प महत्त्वाचा ठरणार आहे.

# रब्बी हंगामासाठी बळीराजा सज्ज

**दै. आवाज वृत्तसेवा...**

**लक्ष्मण घुगे राजापूर प्रतिनिधी–** येवला तालुक्यातील उत्तर पूर्व भागामध्ये सध्या शेतकऱ्यांचे रब्बी हगामातील पिकाची पेरणी साठी धडपड सुरू झाली असून शेतकरी रब्बी हंगामातील पिकांसाठी सज्ज झाला आहे. मागे खरिपातील पिकांचे मोठे नुकसान झाले असले तरी शेतकरी हा जगाचा पोशिंदा असला तरी आशाव-ादी राहून शेतकरी रबबी साठी सज्ज झाला आहे. शेतकरी वर्ग रब्बी हंगामातील गहू पेरणी सध्या सुरू असून शेतकरी वर्ग कामात व्यस्त आहेत हिवाळा सुरू झाला असल्याने रब्बी हंगामातील गहू पेरणी जोरात सुरु आहेत. काही काही प्रमाणात रांगडा कांदा असे कामे सुरू झाली असली तरी मागील खरीप-ातील पिकांचे मोठे नुकसान झाले असले शेतकरी वर्ग मागील नुकसानेतून सावरत नाही तोच पुन्हा रब्बीची पेरणी अशा वादावर करत आहे. मागे शेतकऱ्यांना आपला केलेला खर्च सुद्धा वसूल होणार नाही अशी परिस्थिती निर्माण झाली असल्याने शेतकरी वर्ग हवालदिल झाले असले तरी सध्या



लाल कांदा लागवडीसाठी कांदा रोपे राहिले नसल्याने जेमतेम राहिलेल्या पातळ नितळ रोपांवर पाच गुंठे दहा गुंठे असे कांदा लागवड करण्याची वेळ शेतकऱ्यांवर आली आहे मागे परतीच्या पावसाने शेतकऱ्यांचे रोपे पूर्ण खराब झाली असल्याने सर्वत्र रोपे खराब झाली आहे त्यामुळे पुढे कांदा कितीही भाव विकला तर तयाचा काही उपयोग नाही. भविष्यात कांदाच नसल्याने शेतकऱ्यांना दोन पैसे कसे होणार अशी परिस्थिती उद्भवणार आहे. शेतकऱ्यांनी खरीपातील लाल कांदा लागवड केली होती परंतु पावसाने सर्व या कांदा लागवड खराब झाले असल्याने हे कांदा पीक हातातून गेले आहे. महागडे कादा बियाणे, लागवड खरच सुधदा फिटणार नाही. अशी परिस्थिती लाल कांद्याची झाली आहे व आता रांगडा व उन्हाळा कांदा यावरच संपूर्ण भविष्य अवलंबून असले तरी रांगडा कांद्याची रोपे नाही व आता सध्या ज्या शेतकऱ्यांची शेततळे आहे त्यांचे उन्हाळ कांद्यासाठी रोपे टाकण्याची धडपड सुरू झाली असली तरी उन्हाळा कांदा बियाणे महागले असल्याने शेतकऱ्यांच्या चिंतेत भर पडली आहे व रब्बी हंगामातील पिकासाठी शेतकरी सज्ज झाला आहे. गहूपेरीला शेतकऱ्यांची पसंती दिली आहे.

# शाहू महोत्सवांतर्गत नृत्य व गायन स्पर्धेचे ऑडिशन उत्साहात संपन्न

**दै. आवाज वृत्तसेवा...**

जे.के. गोरंबेकर/ कागल,

इचलकरंजी / कोल्हापूर येथे गेली ११ वर्ष शाहू महोत्सवाचे आयोजन केले जात असून हे १२ वे वर्ष आहे. या शाहू महोत्सव -२०२५ चे उदघाटन माजी उपगराध्यक्ष रविसाहेब रजपूते तसेच चंदूर गावच्या सरपंच सौं. स्नेहल कांबळे यांच्या शुभ हस्ते करण्यात आले.

यावेळी सर्व प्रथम छत्रपती शाहू महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून वंदन करण्यात आले त्यानंतर दीप प्रज्व-लन करून या शाहू महोत्सव चे उदघाटन करण्यात आले. यावेळी माजी उपगराध्यक्ष रविसाहेब रजपूते म्हणाले की, छत्रपती शाहू महाराज मुळे बहुजन समाजाची प्रगती झाली आहे. कोल्हापूर जिल्हा हा त्यांच्या मुळेच समृद्ध झाला आहे. अरुण कांबळे यांनी इचलकरंजी शहरा मध्ये कोठेही खंड न पडता अखंड पणे ११




वर्षे शाहू महोत्सव मोठया उत्साहात घेऊन त्यांनी इचलकरंजी शहरात खऱ्या अर्थाने शाहू महाराज यांच्या कार्याचा प्रचार आणि प्रसार केला आहे. मी नेहमी या कार्यास त्यांच्या खंबीर पणे पाठीशी राहीन.

शाहू महोत्सव चे संकल्पक प्रमुख अरुण कांबळे म्हणाले की, शाहू महोत्सव चे एक ब्रीद वाक्य आहे मनोरंजनाचा सागर, विचारांचा जागर या वाक्याला अनुसरूनच शाहू महोत्सव मध्ये नृत्य -गायन सारखे स्पर्धा घेऊन कलाकारांना एक कलेचे कलामंच निर्माण करून दिला आहे तसेच प्रबोधननात्मक संविधान जागर, शाहू ग्रंथ दिंडी अशा प्रकारे कार्यक्रम घेऊन विचारांचा जागर केला गेला आहे. तसेच वेगवेगळ्या क्षेत्रात आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटवनाऱ्या व्यक्तीना मानाचा राज्यस्तरीय लोकराजा शाहू पुरस्कार देऊन त्यांना प्रोत्साहन देत आहे. यावेळी शाहू महोत्सव चे सदस्य प्रमोद सिद्राम कांबळे (आनुरकर )यांनी शाहू महोत्सव ची रूपरेषा सांगितली. यामध्ये शाहू महोत्सव हा एका महिन्यात टप्पा टप्याने पाच दिवस-ाचा घेण्यात येणार असून त्याची सुरवात आज घोरपडे नाट्यगृह येथे नृत्य -गायन स्पर्धेचे ऑडिशन घेऊन करन्यात आली आहे.याची उपांत्यफेरी शनिवार दि १५ नोव्हेंबर रोजी घऊ स्टुडिओ मध्ये घेण्यात येणार आहे. त्याच बरोबर दि. १८ रोजी शाहू ग्रंथ दिंडी जनता चौक ते नाट्यगृह चौक पर्यत काढण्यात येणार आहे तसेच बुधवार दि. २६ रोजी संविधान जागर हा कार्यक्रम व्यंकटराव हायस्कुल ज्युनियर कॉलेज इचलकरंजी येथे घेण्यात येणार आणि मुख्य कार्यक्रम हा दि. ३० नोव्हेंबर रोजी सकाळी १० वाजलेपासून रात्री १० वाजेपर्यंत घेण्यात येणार असून यामध्ये नृत्य -गायन महाअंतिम सोहळा, सांस्कृतिक कार्यक्रम, व्याख्यान, लोकराजा शाहू पुरस्कार, बक्षीस वितरण समारंभ रोटरी क्लब इचलकरंजी येथे घेण्यात येणार आहे. हा कार्यक्रम सर्वांच्यासाठी पूर्णतः मोफत असून सर्वांनी या सर्व कार्यक्रम चा लाभ घ्यावा असे आवाहन शाहू महोत्सव चे संकल्पक प्रमुख अरुण कांबळे यांनी केले आहे. यावेळी शाहू महोत्सवच्या सेक्रेटरी सौं अक्षरा अरुण कांबळे, सदस्य अभिजित जांभळीकर, प्रथमेश कांबळे, परीक्षक मदनलाल शर्मा, संगीतकार केदार कुलकर्णी, नृत्य विशारद नीलम येसाटे, प्रियांका कांबळे, समृद्धी सुतार, अविनाश मोरे, विना कांबळे आदी सदस्य तसेच मोठ्या संख्येने कलाकार व पालक उपस्थित होते.

# भुमि क्रिकेट अकॅडमी ने जिंकली महाराजा रणजित सिंहजी अंडर-१५ क्रिकेट स्पर्धा

**दै. आवाज वृत्तसेवा...**

मनमाड- मनमाड येथे नुकतीच झालेली अंडर-१५ क्रिकेट स्पर्धा उत्साहात आणि शिस्तबद्धपणे श्री. गुरुगोबिंद सिंग हायस्कूल ग्राऊंडवर पार पडली. या स्पर्धेचे आयोजन मनमाड गुरुद्वारा गुपतसर साहेब व श्री. गुरुगोबिंद सिंग हायस्कूल यांच्या वतीने करण्यात आले होते.

या स्पर्धेत विविध शहरातील आणि क्रिकेट क्लबमधील १५ वर्षाखालील खेळाडूंनी सहभाग घेतला. सर्व संघांनी उत्तम खेळ कौशल्य आणि संघभावना दाखवून प्रेक्षकांची मने जिंकली.

सामण्याच्या सुरुवातीस मनमाड गुरुद्वारा प्रबंधक जतेदार बाबा रणजित सिंगजी , पोलीस उपअधीक्षक मालेगाव तेगबीरसिंग संधु सर , बाजीराव महाजन सर डि वाय एस पी मनमाड , विजय करे सर पी आय मनमाड, सुखदेव सिंग सर प्रशासक एसजीजीएस मनमाड , सौ. सविताताई गिडगे , बबलुभाऊ पाटील , गुरजीतसिंग कांत , गुरदिपसिंग कांत, डॉ. वालीया नासिक , शॅकी जंग्गी मनमाड हे प्रमुख अतिथी म्हणून लाभले.

तेगबीरसिंग संधु सर डेप्युटी सुप्रिडेन्ट ऑफ पोलीस मालेगाव यांच्या हस्ते भुमी क्रिकेट अकॅडमी मनमाड विरुध्द नेसा , नांदगाव याच्यांतील अंतिम सामण्याचे नाणेफेक करण्यात आले.



या सामन्यात मनमाड संघाने रोमांचक विजय मिळवून महाराजा रणजित सिंगजी चषकावर लागोपाठ दुसर्यांदा नाव कोरले व ११००० रु. रकमेचा मानकरि ठरला.

अंतिम सामण्यात बहुमोल प्रदर्शन करुन मनमाड संघातील शान मोकळ हा सामणावीर ठरला तसेच स्पर्धेत सर्वाधिक धावा करुन स्पर्धेतील सर्वोत्कृष्ट फलंदाज देखील तोच ठरला. नांदगाव संघातील पवन दुबे हा मॅन ऑफ द सिरीज तसेच शौर्य खरोटे हा स्पर्धेतील सर्वोत्कृष्ट गोलंदाजाला मानकरी ठरला.मनमाड संघाचा कर्णधार खुशाल परळकर हा स्पर्धेत मोस्ट वॅल्युएबल खेळाडु ठरला. या स्पर्धेत प्रथम पारितोषिक ११००० रु. अमनसिंग हॅपी यांच्या तर्फे देण्यात आले तसेच द्वितीय पारितोषिक ७००१ रु. श्री. साईनाथभाऊ गिडगे व सौ. सविताताई गिडगे यांच्यातर्फे देण्यात आले. बबलुभाऊ पाटिल , सुरज अरोरा , हसमितसिंग चोटमुरादी , तैय्यबभाई शेख यांच्या तर्फेही पारितोषिक देण्यात आले.

समारोप समारंभात विजेत्या संघाला आकर्षक चषक व पारितोषिके देण्यात आली. तसेच सर्व सहभागी खेळाडूंना प्रमाणपत्रे व स्मृतिचिन्हे देऊन गौरविण्यात आले.

या स्पर्धेच्या आयोजनात भुमी क्रिकेट अकॅडमीतील खेळाडुंची महत्त्वपूर्ण भुमिका ठरली तसेच स्पर्धेत पंच म्हणुन स्वामी दिंडे , आदित्य वणवे , विवेक माकुने व शुभम बिडगर यांनी अत्यंत सुंदररीत्या पार पाडली. भुमी क्रिकेट अकॅडमीचे संचालक श्री. वाल्मीक रोकडे व सिध्दार्थ ( भोला ) रोकडे यांनी खेळाडुंना शुभेच्छा दिल्या.

# दिल्लीतील दहशतवादी हल्ला देशासाठी मोठा धक्का!

**दै. आवाज वृत्तसेवा...**

१० नोव्हेंबर २०२५ रोजी दिल्लीतील लाल किल्ला परिसरात एका कारमध्ये झालेला स्फोट दहशतवादी घटना असल्याचे सिध्द झाले आहे. दिल्लीतील बॉम्ब स्फोटानंतर तपास यंत्रणांनी अनेक संशयास्पद स्थळ आपल्या नियंत्रणात घेतले आहेत. त्यामध्ये अल-फलाह विद्यापीठाचा समावेश आहे.दिल्लीतील बॉम्बस्फोट आणि व्हाईट कॉलर्डमॉड्युलचा पर्दाफाश झाल्यानंतर हरयाणाच्या फरिदाबाद जिल्ह्यातील मुस्लिमबहुल धौज गावातील अर-फलाह विद्यापीठ आणि त्याचा ७६ एकरचा विस्तीर्ण परिसर संशयाच्या भोवऱ्यात सापडला आहे. जैश-ए-मोहम्मदने डॉक्टर पेशाच्या माध्यमातून घृणास्पद बॉम्ब हल्ला केला ही देशासह जगासाठी अत्यंत धक्कादायक घटना आहे. डॉक्टर पेशाला दैवी शक्ती मानल्या जाते.परंतु दिल्ली बॉम्ब ब्लास्टनंतर डॉक्टर पेशाला आतंकवाद्यांनी कलंकित केले आहे.त्यांना आता जशास तसे उत्तर देण्याची नितांत गरज आहे.कारण आश्चर्याची गोष्ट म्हणजे या आतंकवादी हल्ल्याला अंजाम देण्यासाठी संपूर्ण आतंकवादी डॉक्टर पेशातून आपापली रुपरेशा आणि गाईडलाईन ठरवित होते. त्याचप्रमाणे यांचे मनसुबे अत्यंत घातक व भयावह होते कारण हे हल्ले मुंबई बॉम्बस्फोटाच्या धर्तीवर असल्याचा कट तपास यंत्रणेकडुन लक्षात येते.देशातील मोठ्या शहरांमध्ये २०० हुन अधिक धमाके करण्याच्या तयारीत ही आतंकवादी संघटना होती.यामध्ये राजधानीतील इंडिया गेट,कॉन्स्टिट्युशन क्लब, गौरीशंकर मंदिर, रेल्वे स्थानके, दिल्लीतील मॉल, तसेच गुरूग्राम आणि फरिदाबाद येथेही त्यांना घातपात घडवून आणायचा प्लॅन होता अशी माहिती तपासातून समोर आली आहे.दिल्लीतील हल्ले घडवून आणण्याचे कारस्थान पाकिस्तानमधील जैश-ए-मोहम्मद ही संघटना जानेवारी पासून कट रचत होती हेही उघडकीस आले आहे.त्याचप्रमाणे दिल्लीतील धमाका मोठ्या जमावाच्या ठिकाणी करण्याचा विचार होता. परंतु ट्राफीक सिग्नलवर तीन तास आतंकवाद्यांची गाडी थांबल्याने मोठा अनर्थ टळल्याचे सांगितले जाते.तरीही दिल्लीतील बॉम्ब ब्लास्ट हा भयावह असल्याचे दिसून आले. यावरून स्पष्ट होते की आतंकवाद्यांना जात धर्म,पंथ, पेशा,मानुस्की, डॉक्टर,आबालवृद्ध यांच्याशी काहीही देणेघेणे नसतेच त्यांना फक्त दहशत निर्माण करून भितीचे वातावरण निर्माण करणे हाच एकमेव उद्देश असतो हे स्पष्ट होते आणि या हल्ल्याचा सुत्रधार जैश -ए-मोहम्मदच आहे यात दुमत नाही. परंतु यात पाकिस्तान व तेथील संपुर्ण आतंकवादी संघटना यात सहभागी असल्याचे दिसून येते.देशात आतंकवाद्यांनी अनेक हल्ले केलेत परंतु दिल्लीतील बॉम्ब ब्लास्टमध्ये आतंकवाद्यांनी जी टेकनीक आणि टेक्नॉलॉजी वापरली ती अत्यंत घृणास्पद म्हणावी लागेल.कारण जगातील महान आणि जीवनदान देणारा पेशा हा डॉक्टर असतो. परंतु आतंकवाद्यांच्या कारवाईचे अनेक प्लॅन फेल होत आहे असे त्यांच्या मास्टर माईंड व आकांना वाटु लागेल अशा परिस्थितीत आतंकवाद्यांनी दहशत निर्माण करण्यासाठी डॉक्टरी पेशेचा वापर करून दिल्लीमध्ये बॉम्बस्फोट घडवून आणला व यात १३ निरपराधांचा बळी गेला आणि अनेक जण गंभीररित्या जखमी झालेत.भारतीय सेनेने आतंकवाद्यांची संपूर्णपणे कंबर मोडली आहे आणि मोडत आहे. त्यामुळे आतंकवादी आगबबुला झाले असावे.त्यामुळे डॉक्टरी पेशाचा वापर आतंकवादी हल्ल्यासाठी कसा करता येईल यासाठी गेल्या एक वर्षापासून जैश-ए-मोहम्मदचे आतंकवादी प्रयत्न करीत होते आणि त्याच प्रयत्नातुन आतंकवाद्यांनी दिल्ली बॉम्ब ब्लास्ट घडवून आणला ही बाब स्पष्ट होते.दिल्ली बॉम्ब स्फोटात तुर्की कनेक्शन उघडकीस आले आहे.यावरून स्पष्ट होते की या हल्ल्यात फक्त तुर्की किंवा पाकिस्तान नसुन आंतरराष्ट्रीय आतंकवादी संघटना या हल्ल्यात सहभागी असावे असे मला वाटते. कारण भारताची प्रगती अनेक देशांना खुपत असावी त्यामुळे भारत विरोधी देश अशाप्रकारच्या आतंकवादी कारवायांना मदत करीत असावेत.लाल किल्ल्याजवळ झालेला भयंकर स्फोट हा केवळ अपघात नव्हता तर ६ डिसेंबरला मोठा दहशतवादी हल्ला करण्याचे नियोजन आतंकवादी संघटनेचे होते ही बाब सुध्दा उघडकीस आली आहे.अधिकाऱ्याच्या मते फरीदाबाद मॉड्यूल वेळेवर उघडकीस आले नसते, तर ६ डिसेंबरला दिल्लीला हादरवणारा स्फोट झाला असता असेही सरकारी सुत्रांकडून समजते, म्हणजेच आतंकवाद्यांचे मनसुबे भयानक होते.परंतु देशाच्या सुरक्षा एजन्सीने अनेक ठिकाणी धाडी टाकून मोठ्या प्रमाणात विस्फोटक पकडले व आतंकवाद्यांचे पुढील नियोजन निष्फळ केले.दिल्ली बॉम्ब स्फोटाची अनेक देशांनी निंदा केली.परंतु पाकिस्तान म्हणतो की, दिल्लीतील बॉम्ब ब्लास्ट हा सिलेंडरमुळे झालेला स्फोट आहे.यावरून स्पष्ट होते की, पाकिस्तानची शेपुट वाकड ते वाकडच! दिल्लीतील बॉम्ब स्फोटावरून स्पष्ट होते की भारतातील काही संघटनांचे तार पाकिस्तान, तुर्कीसह आंतरराष्ट्रीय आतंकवाद्यांशी जुळले असावेत. देशातील जनतेनी आतंकवाद्यांचा नायनाट करण्यासाठी सरकारला व सुरक्षा विभागाला सर्वोतोपरी मदत करावी.सरकार व सुरक्षा विभाग आपापल्या पद्धतीने कार्य करीत आहे तरीही जनतेचे सहकार्य आवश्यक असते.१० नोव्हेंबर २०२५ देशासाठी काळा दिवस ठरला या आतंकवादी हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्यांच्या प्रती शोक संवेदना प्रगट करतो व जखमी झालेले नागरिक ताबडतोब दुरुस्त व्हावे ही ईश्वरचरणी प्रार्थना.





**रमेश लांजेवार (प्रदेश प्रवक्ता)**
**(महाराष्ट्र कलाल-कलार समाज संघटना)**
**मो.नं.९९२१६९०७७९,**
**नागपूर.**

# धारणगाव खडक येथील श्री दत्त देवस्थान परिसरातील सुशोभिकरण कामाचा शुभारंभ

**दै. आवाज वृत्तसेवा...**

निफाड :- श्री दत्त देवस्थान धारणगाव खडक हे अतिशय महत्वाचे धार्मिक स्थळ आहे. याठिकाणी मोठ्या प्रमाणात भाविक येतात या येणाऱ्या भाविकांना चांगल्या दर्जाच्या सेवा उपलब्ध करून देण्यासाठी आपले प्रयत्न आहे. तसेच आगामी कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर याठिकाणी अधिक विकासकामे करण्यास प्राधान्य देण्यात येतील असे प्रतिपादन विधानपरिषदेचे आमदार पंकज भुजबळ यांनी केले.

धारणगांव खडक येथे स्थानिक विकास कार्यक्रम अंतर्गत श्री दत्त देवस्थान मंदिराजवळ २० लाख रुपये निधीतून सुशोभिकरण कामाचे भूमिपूजन विधानपरिषदेचे आमदार पंकज भुजबळ यांच्या हस्ते करण्यात आले. त्यावेळी आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.

यावेळी मठाधिपती महेशगिरी महाराज, तालुकाध्यक्ष भाऊसाहेब भवर, डॉ.श्रीकांत आवारे, पांडुरंग राऊत, विनोद जोशी, अशोक नागरे, शिवाजी सुपनर , अनिल सोनवणे, बालेश जाधव, विलास गोरे, विष्णू पुंड, ओम राऊत, अनिल विंचूरकर यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते व भाविक बहुसंख्येने उपस्थित होते. यावेळी आमदार पंकज भुजबळ म्हणाले की, राज्याचे अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांनी नाशिक जिल्ह्याचे पालकमंत्री व पर्यटन मंत्री म्हणून काम करत असताना नाशिकसह



राज्यातील धार्मिक स्थळांचा मोठ्या प्रमाणात विकास केला आहे. माजी खासदार समीर भुजबळ यांनी लोकसभा क्षेत्रातील महत्वाच्या देवस्थानाचा विकास केला आहे. सप्तशृंगी गडावर फर्निक्युलर ट्रॉली विकसित केली. त्याचबरोबर नस्तनपूर, कोटमगाव जगदंबा देवी, चांदवड येथील रेणुका माता यासह विविध धार्मिक स्थळांचा विकास केला असल्याचे त्यांनी सांगितले.

ते म्हणाले की, आज महेशगिरी यांच्या मार्गदर्शनाखाली दत्तधाम देवस्थान धारणगाव खडकचा विकास होत आहे. या धार्मिक स्थळाच्या विकासासाठी आवश्यक तो निधी उपलब्ध करून दिला जाईल. आगामी कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर या देवस्थानाच्या परिसरात अधिक विकास करण्याच्या दृष्टीने कामे करण्यात येतील. तसेच येथील रस्ते व परिसरातील सुशोभिकरणाची कामे प्राधान्याने मार्गी लावली जातील असे त्यांनी यावेळी सांगितले.

# मुख्यमंत्र्यांच्या हस्ते कुंभमेळ्यासाठी साडेपाच हजार कोटी रुपये खर्चाच्या विकासकामांचे भूमिपूजन

(पान १ वरून) विकासकामे करताना नागरिकांचे नुकसान होऊ देणार नाही, तथापि सामाजिक कार्य समजून नागरिकांनीही विकासकामांना सहकार्य करावे. साधूसंतांनी शासनाला कुंभमेळा आयोजनासाठी मार्गदर्शन करावे, त्यांचे मार्गदर्शन महत्त्वाचे आहे, असे आवाहन मुख्यमंत्र्यांनी केले.

सिंहस्थ कुंभमेळ्यात ७५ वर्षानंतर त्रिखंड योग जुळून आल्याने हे कुंभपर्व विशेष असून ते २८ महिने चालणार आहे. ४० ते ४२ पर्वस्नान आणि महत्त्वाचे अमृतस्नान या कुंभात होणार आहे. प्रयागराज कुंभमेळ्यात देशातील सांस्कृतिक पुर्नजागरणाच्या मोहिमेची प्रचिती आली. याच कुंभच्या परंपरेत नाशिक आणि त्र्यंबकेश्वरचा कुंभमेळा महत्त्वाचा मानला जातो. प्रयागराज येथे १५ हजार हेक्टर जागा असून नाशिक-त्र्यंबकेश्वर येथे ५०० एकर जागा आहे. अत्यंत कमी जागा असूनही २०१५ मध्ये कुंभमेळ्याचे चांगले आयोजन करण्यात आले. यावेळीदेखील असे आयोजन व्हावे, यादृष्टीने शासन आणि प्रशासनाने त्यासाठी आवश्यक तयारी सुरू केली आहे, असेही मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

कुंभमेळ्याने नाशिक जगाच्या नकाशावर झळकेल - उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले, सिंहस्थ कुंभमेळ्यामुळे नाशिकचा चेहरामोहरा बदलेल आणि शहराचा नियोजनबद्ध विकास होईल. त्यादृष्टीने प्रशासनाने चांगली तयारी केली आहे. कुंभमेळा यशस्वी करण्यासाठी राज्य शासनाने फार पूर्वीपासून तयारी सुरू केली आहे. नाशिकची जगाच्या नकाशावर आळख निर्माण करणारा हा सोहळा असेल. कुंभपर्व ही नाशिकला सुंदर आणि आधुनिक शहर करण्याचीही संधी आहे.

स्वच्छ, सुंदर आणि सुरक्षित कुंभमेळा होणार - कुंभमेळा मंत्री गिरीश महाजन

कुंभमेळ मंत्री गिरीश महाजन म्हणाले, सिंहस्थ कुंभमेळ्याच्या निमित्ताने विविध विकासकामांचा शुभारंभ होत आहे. मागील कुंभमेळ्याची दखल घेवून अमेरिकेत शासनाचा सन्मान करण्यात आला होता. यावर्षीदेखील दीड वर्षांनी नाशिक-त्र्यंबकेश्वरमध्ये होणाऱ्या कुंभमेळ्याचा लौकीक जगभरात पोहोचणाार आहे. यावेळी गतवर्षीपेक्षा अधिक भाविक येण्याची शक्यता आहे. नाशिक आणि त्र्यंबकेश्वर येथे प्रयागराजच्या तुलनेत जागा कमी असल्याने येणारा कुंभमेळा सुरक्षित व्हावा, यासाठी शासन आणि प्रशासन आतापासून वेगाने काम करीत आहे. स्वच्छ, सुंदर आणि सुरक्षित कुंभमेळा होण्याच्यादृष्टीने नियोजन करण्यात येत आहे. कायदा-सुव्यवस्थेचे वातावरण कायम ठेवण्यासाठी पोलीस दलातर्फे विशेष प्रयत्न करण्यात येत आहेत. नाशिक शहराचा विकास, पर्यटनाला चालना आणि रोजगार निर्मितीसाठी कुंभमेळा महत्वाचा असून साधू-महंत आणि नाशिकरांनी सहभागी व्हावे, घरचे कार्य समजून देशभरातून येणाऱ्या भाविकांच्या आदरातिथ्यासाठी सज्ज व्हावे, असे आवाहन मंत्री महाजन यांनी केले.

****